# इंटरनेटच्या जाळ्यात तरूणाई

आपल्या भारताचं वैशिष्ट्य म्हणजे आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ४० टक्क्याहून अधिक संख्या तरूणांची आहे. प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. त्याचप्रमाणे तरूणाईचं प्रमाण जास्त असणं ही जशी जमेची बाजू आहे तसंच ही पिढी इंटरनेटच्या जाळ्यात गुरफटत चाललीय ही धोक्याची घंटा आहे.

नुकत्याच लोकसत्ता राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या विभागीय स्पर्धा पार पडल्या त्यानिमित्ताने या तरूणाईचे विचार सामर्थ्य ऐकायला मिळाले. अशा दर्जेदार स्पर्धेच्या निमित्ताने वक्त्यांनी इंटरनेटचा पुरेपूर वापर केलेला जाणवला. आपला प्रत्येक विषय मांडत असताना मग तो सामाजिक, आर्थिक, राजकीय असो वा पौराणिक त्याच्या पुष्ट्यर्थ सखोल माहिती जाणून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला होता त्याला स्वतःच्या अनुभव, निरीक्षणाची जोड देवून आपला विषय ठामपणे मांडण्याचा सुंदर प्रयत्न केला होता त्याला स्वतःचा अनुभव, निरीक्षणाची जोड देवून आपला विषय ठामपणे मांडण्याचा सुंदर प्रयत्न केला होता अर्थात काही वक्त्यांच्या मनावरचं दडपण जाणवत होतं. परंतु ज्यांनी आपला विषय पूर्णतः समजून घेवून मांडण्याचा प्रयत्न केला ते विजयी ठरले. कारण त्यांच्या वक्तृत्वातून आत्मविश्वास, विषयाची जाण, समज, सभाधीटपणा ओतप्रोत भरलेला जाणवत होता. आमच्यासारख्या ज्येष्ठांना खरोखरच या तरूणाईचं आणि मायावी इंटरनेटचं अप्रूप वाटल्यास नवल नाही.

स्पर्धा संपल्यानंतर वेगवेगळ्या महाविद्यालयातून आलेल्या तरूणतरूणींनी अगदी मोकळेपणाने, हसतखेळत सभागृहातच झकास सेल्फी काढला. मी कौतुकाने त्यांचा हा आनंदोत्सव पहात होते. आमच्यावेळी असा मोकळेपणा, या सोयी-सुविधा नव्हत्या त्याबद्दल थोडा विषादही वाटला. पण तो क्षणिक होता. कारण इंटरनेटशिवायही केवळ ग्रंथांच्या व ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाने आम्हीही विविध महाविद्यालयीन स्पर्धा गाजवल्या होत्या, असो. कालाय तस्मै नमः|

अलिकडे आम्ही ग्रामीण-शहरी भागातील महाविद्यायीन तरूणांशी चर्चासत्राच्या माध्यमातून संवाद साधतोय. या तरूणांशी संवाद साधल्यानंतर माझ्या मनात अनेक प्रश्नांचं मोहोळ उठलं. स्पर्धेच्या पलिकडे जाऊन ही तरूणाई प्रत्यक्ष जीवनात त्यांनी अभ्यासलेली तत्वं, मूल्य किती आचरणात आणत असतील हा खरोखरच गहन प्रश्न आहे. दुर्दैवाने आपल्या देशातील कोणत्याही परीक्षेत किंवा स्पर्धेत उत्तुंग यश मिळवणाऱ्या व्यक्ती पुन्हा क्वचितच समाजासमोर येतात. या तरूणाईने पोटतिडिकेने मांडलेले विचार, त्यांची मतं, त्यांचा दृष्टीकोन हा तत्कालीक का ठरतो? ही विचारसरणी जीवनाचा एक अविभाज्य भाग म्हणून त्यांची जडणघडण का होत नाही? दिवसेंदिवस आपली नीतीमूल्यं का घसरत चाललीयत? कालौघात प्रत्येक क्षेत्रात प्रचंड बदल होत असताना आपण आपल्या कर्तव्याप्रती डोळेझाक करून केवळ आपल्या हक्कांप्रती का लढतोय?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राज्यघटनेमागचा शुद्ध हेतू लक्षात न घेता आपण मात्र जातपात- धर्माचं राजकारण करण्यात धन्यता मानयोत. अशा आंदोलनातून कोणाचाच विकास होणं अशक्य!

आजची तरूणाई व्हॉटस्ऍप, फेसबूक, ट्विटर, इंटरनेट यांच्या जाळ्यात इतकी गुरफटत चाललीय की ही माध्यमं हा त्यांचा श्वास झालाय. त्यांचा वापर जर काही तास त्यांनी केला नाही तर ती गुदमरून जातात. अस्वस्थ, वेडीपिशी होतात. समाजात वावरत असताना भोवतालच्या परिस्थितीचं त्यांना अजिबात भान नसतं. ती आपल्याच काल्पनिक जगात धुंद होवून जगत असतात. वास्तवाचं भान सोडून अशा कल्पनाविश्वात रमणं हेच आजच्या तरूणाईच्या व्यक्तिमत्व विकासाला अतिशय घातक आहे. सेल्फीच्या वेडानं कित्येकांचे बळी गेलेत आता तर आत्महत्या, बलात्कार, अपघात यांचं व्हिडिओ शूटींग करून ते पसरवणं यातून कोणता बरं सात्विक आनंद मिळतो? संकट समयी दुसऱ्याच्या मदतीला धावून जाण्याऐवजी तटस्थपणे शूटींग करणं ही पशूलाही लाजवील अशी कृती नव्हे का? तरूणांनो, सावध व्हा. या मायावी इंटरनेटच्या जाळ्यात गुरफटू नका. त्याचा सावधपणे वापर करायला शिका. तुमच्या जीवनाचे शिल्पकार तुम्हीच असाल.

श्रद्धा कळंबटे

-बालन्याय मंडळ सदस्य